महाराष्ट्र शासन

क्रमांक:-मजनिप्रा-२०२२/२३/(प्र.क्र.०५/२२)/जसं(आस्था)
E Mail-dowrestt.wrd@maharashtra.gov.in
दूरध्वनी क्र.०२२-२२०२७२७०

जलसंपदा विभाग,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- २५ नोव्हेंबर, २०२२

प्रति,

१) संचालक,
माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई.

२) अधिक्षक अभियंता (जलसंपदा),
ई प्रशासन मंडळ, पुणे.

३) कक्ष अधिकारी, (संगणक कक्ष),
जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

विषय:- मजनिप्रातील पदे प्रतिनियुक्तीने भरण्याकरिता इच्छुकता मागविण्याकरिता संकेत स्थळावर उपलब्ध करणेबाबत.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण मुंबई येथील आस्थापनेवरील ३ पदे प्रतिनियुक्तीने भरावयाची आहेत. त्यानुसार प्राधिकरणातील संचालक, उपसंचालक (हक्कदारी अंमलबजावणी व विनियम) , सहायक संचालक ही ३ पदे प्रतिनियुक्तीने भरण्याकरिता शासन पत्र सोबत जोडले आहे. तरी, मजनिप्रातील पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत इच्छुकता मागविण्याकरिता सदर पत्राची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in आणि www.wrd.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात यावी, ही विनंती.

(जयश्री पीतदार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत- दिनांक-२५/११/२०२२ रोजीचे पत्र.

d:\desktop\२०२२\cr ५-२०२२.docx

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक:-मजनिप्रा-२०२२/२३/(प्र.क्र.०५/२२)/जसं(आस्था)
E Mail-dowrestt.wrd@maharashtra.gov.in
दूरध्वनी क्र.०२२-२२०२७२७०

जलसंपदा विभाग,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- २५ नोव्हेंबर, २०२२

प्रति,

सह/ उप सचिव (आस्थापना)
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई -३२

विषय:- जलसंपदा विभागाच्या अधिपत्त्याखालील कार्यालयात (महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण) संचालक, उपसंचालक व सहायक संचालक ही पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत.

संदर्भ:- १) सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/का.१२, दि.२०.०२.२०१६
२) सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण,मुंबई यांचे पत्र क्र. मजनिप्रा /२०२२ /प्रतिनियुक्ती /३६०, दिनांक ३ जानेवारी २०२२ व दि.११.३.२०२२ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

राज्य शासनाच्या विविध विभागात/ विभागाच्या अधिपत्त्याखालील मंडळे/ महामंडळातील पदांवर संबंधित प्रशासकीय विभागाकडून प्रतिनियुक्तीने करावयाच्या नियुक्त्यांबाबतचे नवीन धोरण सामान्य प्रशासन विभागाने संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक १७.१२.२०१६ अन्वये जाहीर केलेले आहे. सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई या कार्यालयात पुढील तक्त्यात नमूद केलेली पदे प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी इच्छुकता मागविण्यात येत आहे :-

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी (७ व्या वेतन आयोगानुसार) | ज्या संवर्गातून पदभरावयाचे आहे त्या संवर्गाची नांवे | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | संचालक (प्रशुल्क) | S-२५:- ७८,८००-२,०९,२०० | मंत्रालयीन विभागातील उप सचिव जलसंपदा विभागातील अधीक्षक अभियंता समतुल्य वेतनश्रेणी मधील समान वेतनबँड व ग्रेड पे च्या पदावरील अधिकारी. | १.स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवीधर किंवा अर्थशास्त्र/ उपयोजित अर्थशास्त्र यामधील पदव्युत्तर पदवी, जल वापर व्यवस्थापन किंवा व्यवस्थापन यातील पदवीधारक/पदव्युत्तर २. कृषी विषयक अर्थशास्त्राचे पुरेसे ज्ञान असले पाहिजे. |
| २. | उपसंचालक (हक्कदारी अंमलबजावणी व विनियम) | S-२३:- ६७,७००-२,०८,७०० | मंत्रालयीन विभागातील अवर सचिव जलसंपदा विभागातील कार्यकारी अभियंता समतुल्य वेतनश्रेणी मधील समान वेतनबँड व ग्रेड पे च्या पदावरील अधिकारी. | स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवीधर |
| ३ | सहायक संचालक (नियोजन/ अंमलबजावणी/ /प्रशुल्क/ हक्कदारी/ विनियम) | S-२०:- ५६,१००-१,७७,५०० | सहायक संचालक हे पद सहायक अभियंता श्रेणी-(१) /उप विभागीय अभियंता / उप विभागीय अधिकारी या पदाशी समकक्ष अधिकारी/ समतुल्य वेतनश्रेणी मधील समान वेतनबँड व ग्रेड पे च्या पदावरील अधिकारी. | १.स्थापत्य अभियांत्रिकी पदवीधर २.माहिती तंत्रज्ञान मधील पदविका |

२. उपरोक्त पदासाठी प्रतिनियुक्तीवर जाण्यास इच्छुक असलेल्या विभागांमधील अधिकाऱ्यांनी परस्पर अर्ज सादर करु नयेत. त्यांनी आपआपल्या विभागामार्फत अर्ज सादर करावेत. परस्पर

अर्ज सादर केल्यास त्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही व त्याबाबत संबंधितास काहीही उत्तर कळविण्यात येणार नाही.

३. तरी सर्व विभागांना विनंती करण्यात येते की, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई या आस्थापनेवरील संचालक, उपसंचालक (हक्कदारी अंमलबजावणी व विनियम) व सहायक संचालक या पदांवर प्रतिनियुक्तीने जाण्याकरिता इच्छुक असलेल्या आपल्या विभागातील संबंधित अधिकाऱ्यांची नावे त्यांच्या मागील पाच वर्षाच्या गोपनीय अहवालांच्या प्रमाणित प्रतींसह, वैयक्तिक माहिती (Bio Data), संपूर्ण सेवा तपशील (कालावधी, विभाग, पद), ना-विभागीय चौकशीचे प्रमाणपत्र व विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र इ. माहिती शासन निर्णय दिनांक १७.१२.२०१६ मधील तरतूदीनुसार सदर अधिकारी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास पात्र आहे किंवा कसे याबाबतची माहिती सोबतच्या विहित करण्यात आलेल्या विवरणपत्रामध्ये सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दिनांक २७ / १२ / २०२२ पर्यंत निश्चितपणे प्राप्त होतील अशा रितीने कृपया पाठवावीत.

४. इच्छुक अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीसाठी निवड झाल्यास त्यांना संबंधित विभाग कार्यमुक्त करेल किंवा कसे याबाबतही कृपया अभिप्राय द्यावेत.

५. एकदा निवड झालेल्या अधिकाऱ्याला त्याचे नाव मागे घेता येणार नाही. तसेच, सर्व प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येते की, सदर पत्र त्यांच्या अधिपत्त्याखालील कार्यरत असलेल्या वर नमूद केलेल्या संवर्गातील सर्व अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

६. प्रतिनियुक्ती प्रथमत: ३ वर्षासाठी देण्यात यावी व संबंधित अधिकाऱ्यांची इच्छुकता व संवर्ग नियंत्रण विभागाचे सहमतीने हा कालावधी चौथ्या वर्षाकरिता वाढविण्यात यावा. परंतु चार वर्षाचा प्रतिनियुक्तीचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर आणखी एक वर्षासाठी म्हणजेच ५ व्या वर्षासाठी मुदतवाढ द्यावयाची झाल्यास मा. मुख्यमंत्री यांची विनिर्दिष्टपणे मान्यता घेण्यात यावी. ५ वर्षाचा कालावधी संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

७. सदर पत्राची प्रत महाराष्ट्र शासनाच्या http://maharashtra.gov.in, http://intranet.maharashtra.gov.in तसेच जलसंपदा विभागाकरिता http://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

(जया पोतदार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत : प्रतिनियुक्तीने मागवावयाचे विहित विवरणपत्र.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई या कार्यालयातील (१) संचालक (प्रशुल्क), (२) उप संचालक (हक्कदारी, अंमलबजावणी व विनियम) व (३) सहायक संचालक (नियोजन/ अंमलबजावणी /प्रशुल्क/ हक्कदारी/ विनियम) ही पदे प्रतिनियुक्तीने भरण्यासंदर्भात इच्छुकता मागविण्यासाठी विहित करण्यात आलेला नमुना

| | | |
|---|---|---|
| १ | अधिकाऱ्याचे संपूर्ण नांव | |
| २ | पदनाम /संवर्ग<br>पदाची वेतनश्रेणी | |
| ३ | सध्याच्या कार्यालयाचे नांव व पत्ता व दूरध्वनी क्रमांक | |
| ४ | जन्म दिनांक | |
| ५ | शैक्षणिक अर्हता | |
| ६ | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ७ | ज्या पदावर प्रतिनियुक्तीवर जाण्यास इच्छुक आहे ते पद | |
| ८ | मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या छायाप्रती (मूळ गोपनीय अहवाल पाठवू नयेत) | |
| ९ | संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित आहे किंवा कसे ? तसेच, त्यांच्याविरुध्द भ्रष्टाचार/ लाचलुचपत गुन्ह्यासंदर्भातील प्रकरण, फौजदारी प्रकरण प्रलंबित आहे किंवा कसे, | |
| १० | संबंधित अधिकाऱ्याची निवड झाल्यास त्यास तात्काळ कार्यमुक्त करण्यात येईल किंवा कसे | |
| ११ | संबंधित अधिकारी कार्यरत असलेल्या संवर्गामध्ये अर्ज अग्रेषित करण्याच्या दिनांकास १०% पेक्षा अधिक पदे रिक्त आहेत किंवा कसे, | |
| १२ | शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.१७.१२.२०१६ व दि.१६.२.२०१८ मधील तरतूदीनुसार सदर अधिकारी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास पात्र आहे किंवा कसे, | |